F:\CB-2 Building branch\Gen. Letter.docx336

क्र.सि.बी.–२–क/वनजमीन मंजूरी/२०१७/914
कार्यालय पोलीस अधिक्षक गडचिरोली
दिनांक :06/०९/२०१७

**प्रति,**

उपवनसंरक्षक
भामरागड वनविभाग,
आलापल्ली.

**विषय:– मौजा भामरागड येथील पोलीस स्टेशन भामरागड करीता कायमस्वरूपी बांधकाम करण्याकरीता वाढीव वनजमीन मंजूर होणेबाबत.**

–––––०००–––––

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, संपुर्ण गडचिरोली जिल्हा नक्षलप्रभावित क्षेत्र असून नक्षलवाद्यांच्या हिंसक कारवायावर प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाने गंभरतेने विचार करून केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालीयन तैणात या जिल्हयात केली आहे. पोलीस स्टेशन, भामरागड येथे सदर केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालीयन करीता कायमस्वरुपी प्रशासकीय इमारत, निवासी बॅरेक्स, मोर्चा बांधकामाकरीता जागेची आवश्यकता आहे. पोलीस स्टेशन, भामरागड चे बाजूस लागून असलेली आपले विभागाची **वनजमीन भु. क्र. १८६, कंम्पार्टमेंट नं. आराजी ८७.८९ हेक्टर पैकी ५.०० हेक्टर जमीन** पोलीस स्टेशनला लागून असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून वरील जमीन अतिआवश्यक व सोईची आहे. गडचिरोली जिल्हयातील वाढत्या कारवायांवर आळा घालण्याकरीता पोलीस स्टेशनला केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालीयन नक्षलग्रस्त भागात धोकादायक व निकट परिस्थितीमध्ये कार्यरत असून पोलीस दलास आवश्यक सोई–सुविधा व सुरक्षितता पुरविण्यासाठी कायमस्वरुपी बांधकाम करणे अतिआवश्यक आहे.

तरी नमुद पोलीस स्टेशनकरीता आपले विभागाची **वनजमीन भु. क्र. १८६, कंम्पार्टमेंट नं. आराजी ८७.८९ हेक्टर पैकी ५.०० हेक्टर जमीन** जागेत प्रशासकीय इमारत, निवासी बॅरेक्स, मोर्चा व इतर सुरक्षाविषयक बांधकामे चालू करण्याकरीता पोलीस विभागास कायमस्वरुपी बांधकाम तात्काळ मंजूर होऊन उपलब्ध करून देण्यात यावी.
सहपत्र:– एकुण ०८ प्रती.

05/09/17
**( महेंद्र पंडीत भा.पो.से.)**
अप्पर पोलीस अधिक्षक गडचिरोली.
पोलीस अधिक्षक गडचिरोली करीता

O/C

**प्रत सविनय सादर:–**

१) मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपूर (प्रधान मुख्य वनसंरक्षक (हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय वनभवन, रामगीरी रोड सिव्हील लाईन, नागपूर)

**प्रत माहितीस:–**

१) जिल्हाधिकारी, गडचिरोली.
२) वनसंरक्षक, गडचिरोली वनवृत्त गडचिरोली.

6/9/17 (37) 12-9-017

This is to acknowledge that a proposal seeking prior approval of Central Government under the Forest (Conservation) Act 1980 as per the details given below has been successfully uploaded on the portal of the Ministry of Environment, Forests and Climate Change Government of India.

1. **Proposal No.** : FP/MH/Others/27708/2017
2. **Proposal Name** : Bhamragad
3. **Category of the Proposal** : Others
4. **Date of Submission** : 01/09/2017
5. **Name of the Applicant with Contact Details**

| | |
|---|---|
| **Name** | : Dr ABHINAV |
| **Mobile No.** | : 9421312076 |
| **State** | : Maharashtra |
| **District** | : Gadchiroli |
| **Pincode** | : 442605 |

6. **Area Applied (ha.)** : 5

The proposal will be examined by the Nodal Officer, Forest (Conservation) Act, 1980 to assess its completeness.

(System Administrator)